# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रसिद्धी पत्रक

- **महापालिकेचा, समाज केंद्रित हरित पुनर्बांधणी आणि शाश्वत गृहनिर्माण उपक्रम**
- **वीजेच्या बिलात घट, घरांत नैसर्गिक थंडावा**

**मिरा-भाईंदर - सोमवार, १३ जानेवारी २०२५:** पर्यावरण संवर्धन आणि विकास यांचा समतोल साधत मिरा भाईंदर महापानगरपालिकेने प्रायोगिक तत्त्वावर सुरू केलेल्या ‘समाज केंद्रीत हरित पुनर्बांधणी आणि शाश्वत गृहनिर्माण उपक्रम’ या प्रकल्पाला सुरुवात झाली आहे. भाईंदर मधील शिवशक्ती नगर आणि मिरा रोड मधील नव युवन संकुलात सुरू असलेल्या या प्रकल्पामुळे नागरिकांच्या वीजेच्या बिलात घट झाली असून घरांना नैसर्गिक थंडावा मिळत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांनी शनिवारी या संकुलांची पाहणी करून प्रकल्पाचा आढावा घेतला.

दैनंदिन जीवनात विविध प्रकारच्या विद्युत उपकरणांमुळे मोठ्या प्रमाणात वीजेचा वापर होत असतो. त्यामुळे कार्बन उत्सर्जन वाढते आणि पर्यावरणाचे संतुलन बिघडून नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता वाढते. यावर उपाय म्हणून मिरा भाईदर महानगरपालिकेने पर्यावरणपूरक जीवनशैली रुजविण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ‘समाज केंद्रित हरित पुनर्बांधणी आणि शाश्वत गृहनिर्माण उपक्रम’ राबविण्यात येत आहे. आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया या संस्थेच्या माध्यमातून भाईंदर पूर्वेच्या नवघर येथील नवशक्ती नगर येथे आणि मिरा रोड येथील नवयुग संकुलात हा प्रकल्प मागील ३ महिन्यांपासून प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे.

या प्रकल्पाअंतर्गत सर्वप्रथम महापालिकेतर्फे हिट मॅपिंग करण्यात आले. याद्वारे अति उष्ण भागांतील संकुले निवडून तेथे प्राथमिक पातळीवरील प्रकल्प सुरू करण्यात आले. शिवशक्ती नगर येथील चाळितील १०० घरांसह हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. येथे नैसर्गिक थंडावा वाढविण्यासाठी, घराच्या पुढे आणि ‘व्हेंटीलेशन बँड’ बनवले आहेत, छताखाली ॲल्युफॉईल बसवण्यात आले आहे तर छतावर एसआरआय रंग लावण्यात आला आहे.

नव युवन संकुलात एकूण २८० घरे आहे. या प्रकल्पाअंतर्गत येथील पंखे बदलून त्याऐवजी ऊर्जा कार्यक्षम पंखे बसवण्यात आले आहेत. तसेच संकुलातील सार्वजनिक ठिकाणी मोशन सेंसर दिवे बसविण्यात आले आहेत. यासह सौर ऊर्जा पॅनल (सोलार पॅनल) लावण्यात आले. या प्रकल्पाचा भाग म्हणून या संकुलामध्ये सामुदायिक शेती करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. संकुलातील ज्येष्ठ नागरिक सहभागी होऊन भाज्यांची शेती करत आहे. सध्या त्यांनी ५ ते ६ प्रकारच्या भाज्या लावलेल्या आहेत. याशिवाय संकुलात कचऱ्याचे वर्गीकरण करून खतनिर्मिती प्रक्रिया केली जाणार आहे. प्रकल्पांतर्गत विविध बदल केल्यानंतर, वीजेच्या बिलात घट होऊ लागल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी रहिवाशांशी संवाद साधून प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली. हा प्रयोग संपूर्ण शहरात राबविण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.